Vol 5 Issue 1 Oct 2015

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

**Review Of Research**
**ISSN 2249-894X**

**Impact Factor : 3.1402(UIF)**
**Volume - 5 | Issue - 1 | Oct - 2015**

# यवतमाळ शहरातील आयुर्वेदिक उपचार पद्धतीचे महत्व व आयुर्वेदिक उत्पादांच्या लोकप्रीयतेतील वाढीचे विश्लेषणात्मक अध्ययन

*प्रा. सुनिल नामदेवराव ईश्वार*
*शिवशक्ती कला व वाणिज्य महाविद्यालय, बाभुळगाव, जिल्हा यवतमाळ.*

## *सारांश*

आयुर्वेदिक पद्धती भारतातील वैदिक काळातील अमुल्य ज्ञानाचा साठा आहे. यवतमाळशहरातील जनतेस आयुर्वेदाचे महत्व जास्तीत जास्त पटावे. त्याचा त्यांना भरपूर लाभ मिळावा. एक सुदृढ व सशक्त नागरीक निर्माण व्हावा या दृष्टिकोणातून प्रस्तुत विषयाचे महत्व आहे. तसेच यवतमाळ शहरातील आयुर्वेदिक उत्पादनांच्या उत्कृष्ठ विपणन प्रक्रियेच्या माध्यमातून आर्थिक उलाढाल वाढवून नागरिकांना जास्तीत जास्त रोजगार प्राप्त व्हावा आणि आयुर्वेदिक वस्तुंचा मोठयाप्रमाणात वापर व्हावा आणि लोकामध्ये देशाभिमानाची भावना निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून प्रस्तूत विषयाची संशोधनासाठी निवड केलेली आहे.



संशोधनामुळे सशक्त, सुदृढ व निरोगी नागरिक निर्मितीला प्रोत्साहन मिळते. त्यामुळे राष्ट्रउभारणीच्या कार्याला म्हणजेच राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक विकासाला गती देण्याचे कार्य उच्च प्रतिच्या संशोधनामुळे साधले जाते. समाजातील प्रत्येक व्यक्तिचा शारिरीक, बौद्धिक, मानसिक, नैतिक, शैक्षणिक आणि सामाजिक तसेच आर्थिक विकास घडवून आणणे शक्य होते.

## *प्रस्तावना*

भारत देश हा प्रगल्भ सांस्कृतिक वारसा असणारा देश आहे. या आधुनिक काळातही प्रगतीच्या मार्गावरून चालतांना भारतीय व्यक्ती त्या सर्व सांस्कृतिक मूल्यांचे जतन करीत असते. वैदिक काळात निर्माण झालेल्या ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अर्थवेदाचा भारतीय संस्कृती संवर्धनात महत्त्वाचा वाटा आहे. या चार वेदांनपैकी अर्थवेदामध्ये आयुर्वेदिक उपचार पद्धती ही लोकांच्या शुद्ध विचारसरणीसाठी, शुद्ध आचरणासाठी आणि सात्त्विक व संपूर्ण जीवनपद्धतीसाठी प्रतिपादन केलेली आहे.

धर्माची स्थापना, अर्थाजन आणि दिव्य इच्छेने संपत्ती उत्पत्ती या माध्यमातून मोक्षप्राप्ती करणे त्या चतुर्वेविध पुरूषार्थप्राप्तीसाठी सर्वोपरी निरोगी असणे आवश्यक असते. जर शरीर रोगग्रस्त असेल तर तेथे सुखशांती व आनंद कुठे असणार? मनुष्याजवळ धन, ऐश्वर्य आहे. पण शरीरात योग्य रक्तसंचार, शरीर व स्वस्थ मन ठेवण्यासाठी आयुर्वेदाची निर्मिती झाली. जे आजही उपयोगी आहे. शरीराच्या आतील मल आणि दोष दूर करणे आंतरिक शुद्धीकरण करून समाधीच्या माध्यमातून परमानंद मिळण्यासाठी ऋषिमुनी आणि योगी पुरूषांनी आयुर्वेदाचा आविष्कार केलेला आहे.

आजच्या काळात जगातील एकूण लोकसंख्येचा विचार करता भारत हा सर्वाधिक लोकसंख्या असणारा दुस-या क्रमांकाचा देश आहे. भारताची लोकसंख्या १२८५ कोटी आहे. तसेच भारत हा संपूर्ण विकसित नसून विकासनशिल देश आहे. यासर्व घटकांचा परिणाम भारतीय व्यक्तींच्या आजच्या जीवनशैलीवर झालेला दिसून येतो. अनेक शारिरीक व्याध्यीसोबत दिवसेंदिवस वाढणा-या मानसिक व्याध्यी हयाच जिवन पद्धतीचा परिणाम होय.

वेदकालीन ऋषीमुनिंना सांगीतलेल्या योग, प्राणायम तसेच आयुर्वेदाच्या रहस्यामुळे प्रत्येक भारतीय व्यक्ती शारिरीक, बौद्धिक, मानसिक व नैतिकदृष्टया सूदृढ राहून संपूर्ण भारत देशाच्या सुदृढतेसाठी आणि विकासासाठी महत्वाचे योगदान देवू शकतो.

मानवाच्या गरजा अनंत, वाढत्या व पुनरावृत्त होणा-या आहेत. त्या गरजा तृप्त करण्यासाठी प्रत्येक जण आपापल्या परीने प्रयत्न करीत असतो. अन्न-वस्त्र-निवारा या मूलभूत आवश्यक गरजा भागविल्यानंतर तो सुखसोईच्या व चैनीच्या गरजा भागविल्याचा प्रयत्न करतो. या प्रक्रियेतून नवनव्या वस्तूंच्या उत्पादनास चालना मिळाली व त्या वस्तू संभाव्य ग्राहकांपर्यंत म्हणजे बाजारपेठेपर्यंत

पोहोचविण्याची व्यवस्था निर्माण झाली. उत्पादन-स्थळापासून बाजारपेठेपर्यंत वस्तू पोहोचविण्याच्या कार्यास मानवाच्या आर्थिक-सामाजिक जीवनामध्ये अधिकाधिक महत्व प्राप्त झाले. प्रारंभी हे कार्य वस्तूंच्या देवाणघेवाणीपुरते मर्यादित होते. वस्तूंची खरेदी-विक्री घडवून आणणे एवढीच त्या कार्याची व्याप्ती होती. औद्योगिक क्रांती, मोठया प्रमाणावर उत्पादन, कारखाना पद्धतीचा उदय, बाजारपेठांचा विस्तार, मागणीपूर्व उत्पादन, बाजारपेठेतील वांढती स्पर्धा, ग्राहकांची वाढती संख्या इत्यादी कारणांमुळे खरेदी-विक्रीचे कार्य व्यापक व गुंतागुतीचे बनले. त्यातून बाजारपेठ-विषयक विभिन्न कार्याची गरज भासू लागली. त्या बाजारपेठीय कार्यांना 'विपणन कार्य' असे म्हणतात. विपणन कार्यामध्ये उत्पादनस्थळापासून बाजारपेठेपर्यंत वस्तू/ माल पोहोचविण्याच्या सर्व क्रियांचा समावेश होतो. उत्पादकाकडून मालाची/ वस्तूची खरेदी करणे, त्याचे एकत्रीकरण करणे, वर्गीकरण व प्रमाणीकरण करणे, संग्रहन व संस्करण, वाहतूक व्यवस्था, वाटप व्यवस्था, बाजारपेठ शोध या सर्व क्रियांसाठी अर्थपुरवठा व वस्तुंची विक्री या सर्व क्रियांचा 'विपणन' मध्ये समावेश केला जातो.

*सारणी क्रमांक 1: सध्याच्या काळात आयुर्वेदिक उत्पादांच्या लोकप्रीयतेत वाढ होत असण्यासंबंधी आयुर्वेदिक औषधी उत्पादकांच्या प्रतिक्रिया*

| सध्याच्या काळात आयुर्वेदिक उत्पादांच्या लोकप्रीयतेत वाढ | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४२ | ८४ |
| नाही | ८ | १६ |
| एकूण | ५० | १०० |

वरील सारणी क्रमांक १ मध्ये सध्याच्या काळात आयुर्वेदिक उत्पादांच्या लोकप्रीयतेत वाढ होत असण्यासंबंधी आयुर्वेदिक औषधी उत्पादकांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ८४ टक्के आयुर्वेदिक औषधी उत्पादकांना सध्याच्या काळात आयुर्वेदिक उत्पादांच्या लोकप्रीयतेत वाढ होत आहे असे वाटते तर १६ टक्के आयुर्वेदिक औषधी उत्पादकांना असे वाटत नाही. वरील सारणीतील विश्लेषणावरून असे दिसून येते की, बहुतांश आयुर्वेदिक औषधी उत्पादकांना सध्याच्या काळात आयुर्वेदिक उत्पादांच्या लोकप्रीयतेत वाढ होत आहे असे वाटते.

*सारणी क्रमांक 2: वाढत्या लोकप्रीयतेमुळे उत्पादनाची मागणी बाजारात वाढली असण्यासंबंधी आयुर्वेदिक औषधी उत्पादकांच्या प्रतिक्रिया*

| वाढत्या लोकप्रीयतेमुळे बाजारात उत्पादनाची वाढती मागणी | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३८ | ७६ |
| नाही | १२ | २४ |
| एकूण | ५० | १०० |

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये वाढत्या लोकप्रीयतेमुळे उत्पादनाची मागणी बाजारात वाढली असण्यासंबंधी आयुर्वेदिक औषधी उत्पादकांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या प्रतिक्रियांनुसार ७६ टक्के आयुर्वेदिक औषधी उत्पादकांना वाढत्या लोकप्रीयतेमुळे उत्पादनाची मागणी बाजारात वाढली आहे असे वाटते तर २४ टक्के आयुर्वेदिक औषधी उत्पादकांन असे वाटत नाही. वरील माहितीवरून बहुतांश आयुर्वेदिक औषधी उत्पादकांना असे वाटते की, वाढत्या लोकप्रीयतेमुळे उत्पादनाची मागणी बाजारात वाढली आहे.

**सारणी क्रमांक 3: आयुर्वेदिक उपचार पद्धतीच्या महत्वात दिवसेंदिवस वाढ होण्यासंबंधी आयुर्वेदिक डॉक्टरांच्या प्रतिक्रीया**

| आयुर्वेदिक उपचार पद्धतीच्या महत्वात दिवसेंदिवस वाढ | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३५ | ७० |
| नाही | ५ | १० |
| सांगता येत नाही | १० | २० |
| एकूण | ५० | १०० |

वरील सारणी क्रमांक ३ मध्ये आयुर्वेदिक उपचार पद्धतीच्या महत्वात दिवसेंदिवस वाढ होण्यासंबंधी आयुर्वेदिक डॉक्टरांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आली आहे. वरील सारणीतील माहिती वरून असे दिसून येते की, ७० टक्के आयुर्वेदिक डॉक्टरांना आयुर्वेदिक उपचार पद्धतीचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे वाटत असून १० टक्के आयुर्वेदिक डॉक्टरांना असे वाटत नाही. तर आयुर्वेदिक उपचार पद्धतीचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे यासंबंधी अनिर्णीत असणाऱ्या आयुर्वेदिक डॉक्टरांची टक्केवारी २० टक्के होती. यावरून अध्ययनक्षेत्रातील बहुतांश आयुर्वेदिक डॉक्टरांना आयुर्वेदिक उपचार पद्धतीचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे असे वाटत असल्याचे निदर्शनास आले.

**सारणी क्रमांक 4: आयुर्वेदिक उपचार पद्धतीचे महत्व दिवसेंदिवस वाढत असण्यासंदर्भात ग्राहकांच्या प्रतिक्रीया**

| आयुर्वेदिक उपचार पद्धतीचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १७२ | ५७.३ |
| नाही | ४३ | १४.३ |
| सांगता येत नाही | ८५ | २८.३ |
| एकूण | ३०० | १०० |

उपरोक्त सारणी क्रमांक ४ मध्ये आयुर्वेदिक उपचार पद्धतीचे महत्व दिवसेंदिवस वाढत असण्यासंदर्भात ग्राहकांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आलेल्या आहेत. वरील सारणीतील माहिती वरून असे दिसून येते की, ५७.३ टक्के ग्राहकांना आयुर्वेदिक उपचार पद्धतीचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे असे वाटत असून १४.३ टक्के ग्राहकांना असे वाटत नाही. तथापि यासंदर्भात अनिश्चित असणाऱ्या ग्राहकांची टक्केवारी २८.३ टक्के होती. वरील माहितीवरून असे दिसून येते की, अध्ययनक्षेत्रातील बहुतांश ग्राहकांना आयुर्वेदिक उपचार पद्धतीचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे असे वाटत असल्याचे दिसून आले.

**सारणी क्रमांक 5 : आयुर्वेदिक औषधी निर्माण उद्योगांची अन्य औषधी उद्योगांसोबत स्पर्धाआहे त्यासंबंधी माहिती**

| अन्य आयुर्वेदिक औषधी उत्पादकांसोबत स्पर्धा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| कोणीच नाही | ६ | १२ |
| १ ते ५ | ७ | १४ |
| ६ ते १० | ११ | २२ |
| ११ ते १५ | २४ | ४८ |
| १६ ते २० | १ | २ |
| २१ पेक्षा अधिक | १ | २ |
| एकूण | ५० | १०० |

वरील सारणी क्रमांक ५ मध्ये आयुर्वेदिक औषधी निर्माण उद्योगांची अन्य किती औषधी उद्योगांसोबत स्पर्धाआहे त्यासंबंधी माहिती दर्शविण्यात आलेली आहे. वरील सारणीतील माहिती वरून असे दिसून येते की, ४८ टक्के औषधी निर्माण उद्योगांची इतर ११ ते १५ आयुर्वेदिक औषधी उत्पादकांसोबत स्पर्धा असून २२ टक्के उद्योगांची स्पर्धा इतर ६ ते १० आयुर्वेदिक औषधी

उत्पादकांसोबत असल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे स्पर्धा १ ते ५, कुणाशीही नाही, व १६ ते २० आयुर्वेदिक औषधी उत्पादकांसोबत असणाऱ्या आयुर्वेदिक औषधी उत्पदकांची टक्केवारी अनुक्रमे १४ टक्के, १२ टक्के व २ टक्के होती तर २ टक्के उद्योगांची स्पर्धा २१ पेक्षा अधिक आयुर्वेदिक औषधी उत्पादकांसोबत असल्याचे आढळले. यावरून अध्ययनक्षेत्रातील बहुतांश आयुर्वेदिक औषधी निर्माण उद्योगांची स्पर्धा ११ ते १५ आयुर्वेदिक औषधी उत्पादकांसोबत असल्याचे दिसून आले.

## *निष्कर्ष*

आयुर्वेदिक औषधी उत्पादकांना सध्याच्या काळात आयुर्वेदिक उत्पादांच्या लोकप्रीयतेत वाढ होत आहे असे वाटते व वाढत्या लोकप्रीयतेमुळे उत्पादनाची मागणी बाजारात वाढली आहे. आयुर्वेदिक औषधी उत्पादनाच्या मागणीत अंदाजे २१ ते ३० टक्के वाढझाली आहे.आयुर्वेदिक औषधी उत्पादक स्पर्धा तत्वानुसार आपल्या उत्पादांच्या किंमतीचे निर्धारण करतात. बहुतांश आयुर्वेदिक औषधी उद्योगांच्या शाखा इतरत्र उपलब्ध नाहीत. आयुर्वेदिक औषधी उद्योग उत्पादांच्या वितरणाकरिता एकापेक्षा अधिक वितरण पद्धतीचा उपयोग करतात तथापि बहुतांश आयुर्वेदिक औषधी उद्योग उत्पादांचे वितरण वितरकांद्वारे करतात.

## *संदर्भ ग्रंथ सूची*


१. सामाजिक संशोधन पद्धती– डॉ. पु. ल. भांडारकर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, औरंगाबाद.
२. सामाजिक संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्रे– डॉ. प्रदिप आगलावे, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
३. साख्यिकीय पद्धती– डॉ. देशकर, डॉ. देशपांडे, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिकेशन, नागपूर.
४. शास्त्रीय संशोधन पद्धती – डॉ. पी. एम. क–हाडे पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
५. प्रा. सुधाकर मानकर, प्रा. रमेश देशपांडे. विपणनाची तत्वे, २०११, फडके प्रकाशन, कोल्हापूर
६. Complete History of Ayurveda &Dr. R. Vaidyanath, Dr. K. Nishteshwar, Chowkhamba Series, Varanasi Complete.
७.Marketing Management – Rajan Saxena, Tata Magraw - Hill Publishing Company Ltd. New Delhi
८.Information of Ayurvedic Medicine- By subhuti Dharmananda Industries Director of traditional medicine Protiland, Oregaon
९.योग संदेश मासिक – मे २०१४
१०.Web sites -
a) www. Google.com
b) yahoo.com

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com